**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट क्रमांक :- २२८** **दिनांक :- २५/०८/२०२१**

## साईशा आयुर्वेदीक वेलनेस मसाज पार्लरच्या नावाखाली चालणा-या वेश्याव्यवसायावर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाची कारवाई.

अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखेचे वपोनि श्री. एस. एस. पाटील यांना गोपनीय माहिती मिळाली की, गाळा नं.०८, ज्योती ब्रिज बिल्डीग, मंगलनगर, हाटकेश, काशिमीरा येथील साईशा आयुर्वेदिक वेलनेस सेंटर या नावाने चालणा-या मसाज पार्लरमध्ये मसाजच्या नावाखाली पुरुष गि-हाईकांना वेश्यागमनाच्या मोबदल्यात मुली पुरवितात अशी खात्रीशीर माहीती मिळाल्याने वपोनि./पाटील यांनी बोगस गि-हाईक व पंच यांना पाठवून मिळालेल्या बातमीची सत्यता पडताळुन दिनांक २३/८/२०२१ रोजी १७.३० वा. गाळा नं.०८, ज्योती ब्रिज बिल्डीग, मंगलनगर, हाटकेश, काशिमीरा येथील साईशा आयुर्वेदिक वेलनेस सेंटर येथे छापा टाकला असता मसाज पार्लर चालविणारा इसम नामे सतिष दयानंद पदमशाली वय ३० वर्ष रा. डी-२१२, रत्नदिप कॉम्प्लेक्स, स्मशान रोड, रिलायन्स पॉवर स्टेशनजवळ, भाईंदर पश्चिम, मुळगाव सुरतकल, मॅगलोर व त्याची पत्नी श्रीमती सना मोहम्मद युसूफ दरवेश ऊर्फ सना सतिश पद्मशाली हे मसाजच्या नावाखाली वेश्यागमनाच्या मोबदल्यात पुरुष गि-हाईकांकडुन पैसे स्विकारुन मुली पुरवित असतांना मिळुन आल्याने त्यांना वेश्यागमनाकरीता स्विकारलेल्या रक्कमेसह ताब्यात घेवुन ०२ मुलींची सुटका केली. सदर बाबत वेश्यादलाल सतिष दयानंद पदमशाली वय ३० वर्ष व त्याची पत्नी श्रीमती सना मोहम्मद युसूफ दरवेश ऊर्फ सना सतिश पद्मशाली यांचे विरुद्ध काशिमीरा पोलीस ठाणे येथे पोहवा/२२६९ उमेश पाटील यांनी सरकार तर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन काशिमीरा पोलीस ठाणे गुन्हा रजि क्र.५७४/२०२१ भा.द.वि. कलम -३७०, ३४, सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४, ५, ६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी श्रीमती सना मोहम्मद युसूफ दरवेश ऊर्फ सना सतिश पद्मशाली ही अभिलेखावरील गुन्हेगार असून तिचेविरुध्द काशिमीरा पोलीस ठाणे येथे गुन्हा क्र.८५४/२०२० भादविसं.क. ३७० सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३, ४, ५, ७ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री महेश पाटील, पोलीस उप.आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर विभागाचे व.पो.नि. श्री. संपतराव पाटील, सपोनि. तेजश्री शिंदे (भरोसा सेल), पोहवा. २२६९ उमेश पाटील, पोहवा. २२९८ निलंगे, मपोना.१७८९ यम्बर, पो.शि.३६६० केशव शिंदे, मपोशि.१०७८ सुप्रिया तिवले व चालक पो.ना.२६३८ गावडे सर्व नेमणुक-अनैतिक मानवी वहातुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर (प.) यांनी केली आहे.

------ooooo-----